**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,**
**फोर्ट, मुंबई- ४००००१.**

**दूरध्वनी क्र.०२२-२२०१ ७१०३** **E-Mail- est14-rdd@mah.gov.in**

---

क्रमांक. जिपब-२०२२/ प्र.क्र.२९/आस्था-१४ दिनांक : २८ नोव्हेंबर, २०२२.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय : सन २०२२ मधील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबत वेळापत्रक.**

**संदर्भ :** १) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था.१४, दिनांक ०७.०४.२०२१.

२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था.१४, दिनांक ०४.०५.२०२२.

३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-२०२२/प्र.क्र.२९/आस्था.१४, दिनांक २९.०६.२०२२.

४) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १८.११.२०२२ चे पत्र.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबत उपरोक्त संदर्भ क्र.४ नुसार वेळापत्रक निर्गमीत करण्यात आले आहे. परंतु, प्रशासकीय कारणास्तव प्रस्तुत वेळापत्रकानुसार विशेष संवर्ग भाग-१ व २ च्या शिक्षकांच्या अर्जांची तपासणी करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे संदर्भाधीन दिनांक १८.११.२०२२ च्या वेळापत्रकामध्ये सुधारणा करुन शिक्षकांच्या बदल्यांबाबत सुधारित वेळापत्रक निश्चित करणे आवश्यक आहे.

सबब, राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करावयाच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबतचे सुधारित वेळापत्रक पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | बाब | दिनांक | | लागणारा कालावधी | संबंधित अधिकारी / कर्मचारी / प्रणाली |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| १ | बदलीपात्र आणि बदली अधिकारप्राप्त याद्या पुनः जाहीर करणे आणि विशेष संवर्ग भाग १ व भाग २ यांच्या याद्या जाहीर करणे | २९.११.२०२२ | २९.११.२०२२ | १ | शिक्षणाधिकारी |
| २ | शिक्षणाधिकाऱ्यांकडे अपील करणे | ३०.११.२०२२ | ०३.१२.२०२२ | ४ | शिक्षक |
| ३ | अपील मंजूर करणे किंवा नाकारणे | ०५.१२.२०२२ | १०.१२.२०२२ | ६ | शिक्षणाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे अपील करणे | ११.१२.२०२२ | १३.१२.२०२२ | ३ | शिक्षक |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेणे | १४.१२.२०२२ | १७.१२.२०२२ | ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ६ | बदली पात्र व बदली अधिकारप्राप्त, विशेष संवर्ग भाग १ व भाग २ यांच्या याद्या पुनः जाहीर करणे | १९.१२.२०२२ | १९.१२.२०२२ | १ | शिक्षणाधिकारी |
| ७ | विशेष संवर्ग भाग १ साठी प्राधान्यक्रम भरणे | २०.१२.२०२२ | २३.१२.२०२२ | ४ | शिक्षक |
| ८ | विशेष संवर्ग भाग १ बदली प्रक्रिया चालविणे | २४.१२.२०२२ | २८.१२.२०२२ | ५ | सॉफ्टवेअर |
| ९ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | २९.१२.२०२२ | २९.१२.२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १० | विशेष संवर्ग भाग-२ साठी प्राधान्यक्रम भरणे | ३०.१२.२०२२ | ०४.०१.२०२३ | ६ | शिक्षक |
| ११ | विशेष संवर्ग भाग-२: बदली प्रक्रिया चालवणे | ०५.०१.२०२३ | ०८.०१.२०२३ | ४ | सॉफ्टवेअर |
| १२ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | ०९.०१.२०२३ | ०९.०१.२०२३ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १३ | बदली अधिकारप्राप्त शिक्षकांनी प्राधान्यक्रम भरणे | १०.०१.२०२३ | १४.०१.२०२३ | ५ | शिक्षक |
| १४ | बदली अधिकारप्राप्त: बदली प्रक्रिया चालवणे | १६.०१.२०२३ | १९.०१.२०२३ | ४ | सॉफ्टवेअर |
| १५ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | २०.०१.२०२३ | २०.०१.२०२३ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १६ | बदलीपात्र शिक्षकांनी प्राधान्यक्रम भरणे | २१.०१.२०२३ | २४.०१.२०२३ | ४ | शिक्षक |
| १७ | बदलीपात्र: बदली प्रक्रिया चालवणे | २५.०१.२०२३ | २९.०१.२०२३ | ५ | सॉफ्टवेअर |
| १८ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | ३०.०१.२०२३ | ३०.०१.२०२३ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १९ | विस्थापित शिक्षकांच्या राऊंडसाठी पर्याय भरणे | ३१.०१.२०२३ | ०३.०२.२०२३ | ४ | शिक्षक |
| २० | विस्थापित शिक्षकांचा राऊंड : विस्थापित शिक्षकांसाठी बदली प्रक्रिया चालविणे | ०४.०२.२०२३ | ०७.०२.२०२३ | ४ | सॉफ्टवेअर |
| २१ | रिक्त पदांची यादी जाहीर करणे | ०८.०२.२०२३ | ०८.०२.२०२३ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २२ | बदलीपात्र शिक्षकांची (१० वर्षे सुगम क्षेत्रात काम केलेले शिक्षक) यादी प्रसिद्ध करणे | ०९.०२.२०२३ | ०९.०२.२०२३ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | अवघड क्षेत्रातील राहिलेल्या रिक्त जागा भरण्याचा राऊंड | १०.०२.२०२३ | १३.०२.२०२३ | ४ | शिक्षक |
| २४ | अवघड क्षेत्रातील राहिलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी बदली प्रक्रिया चालविणे | १४.०२.२०२३ | १७.०२.२०२३ | ४ | सॉफ्टवेअर |
| २५ | बदलीचे आदेश प्रकाशित करणे | १८.०२.२०२३ | १८.०२.२०२३ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |

राज्यातील जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे होणाऱ्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबतची कार्यवाही उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हांतर्गत बदलीच्या अनुषंगाने करावयाची सर्व कामे विहित कालावधीतच पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी. जर सदर कामामध्ये दिरंगाई/ कुचराई झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.

सदर वेळापत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्याबाबत संबंधित शिक्षकांकडून पोहोच घ्यावी व आपल्या अभिलेखामध्ये जतन करुन ठेवावी.

२९/११/२०२२

**( अच्युत इप्पर )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.

१) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व)
२) श्री.आयुष प्रसाद (भाप्रसे), मु. का. अ., जि. प., पुणे तथा अध्यक्ष, जि. प. शिक्षक बदली अभ्यासगट.
३) डॉ.सचिन ओंबासे (भाप्रसे), जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
तत्कालीन मु.का.अ., जि.प. वर्धा तथा राज्य समन्वयक, जि.प.शिक्षक बदली ऑनलाईन संगणक प्रणाली
४) श्री.विनय गौडा (भाप्रसे), सध्या जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
तत्कालीन मु.का.अ., जि.प.सातारा तथा राज्य समन्वयक, जि.प.शिक्षक बदली ऑनलाईन संगणक प्रणाली
५) उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व)
७) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
८) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
९) Vinsys IT Services (I) Pvt. Ltd, Shivaji Niketan, Tejas Society, Kotharud, Pune.
१०) निवडनस्ती कार्यासन आस्था.१४, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.